शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
08 Jan 2025 - Page 6-Niphad

# वाघ महाविद्यालयात कर्मवीर स्मृतीचषक क्रीडा स्पर्धा

**चांदोरी। दि.७ वार्ताहर**

के.के. वाघ शिक्षण संस्था नाशिक, स्माईल व स्पिनॅच सेवाभावी संस्था, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती चषक स्पर्धा अंतर्गत चांदोरी येथील के.के. वाघ शैक्षणिक संकुलात व्हॉलीबॉल व खो-खो क्रीडा स्पर्धा झाल्या.

उद्घाटनप्रसंगी अतिथींच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली. प्रमुख अतिथी माजी आमदार अनिल कदम खेळाडूंना मार्गदर्शन करतांना म्हणाले, या स्पर्धेत सहभागी होणे हीच खरी जिंकण्याची भावना आहे. सांघिक खेळ खेळल्याने तणावमुक्त जीवन जगता येते, आनंद मिळतो. के.के. वाघ शिक्षण संस्था ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास सतत तत्पर असते. म्हणून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे प्रतिपादन त्यांनी केले. माजी जिल्हा परिषद समिती सदस्य दिगंबर गिते म्हणाले, अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील क्रीडाप्रेमींना व्यासपीठ मिळते आणि नवोदित खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रगती करण्यासाठी प्रेरणा मिळते. वरिष्ठ महाविद्यालय प्राचार्य डॉ.एम.के. देवरे यांनी प्रास्ताविकातून अशा स्पर्धा परस्परांशी संवाद साधण्याची आणि परस्परांवरील विश्वास वाढविण्याचे माध्यम ठरत असल्याचे सांगितले.

अध्यक्षस्थानी स्माईल व स्पिनॅचचे अध्यक्ष अजिंक्य वाघ होते. व्यासपीठावर महाविद्यालयीन विकास समिती सदस्य सुरेश भोज, द्वारकानाथ कोकाटे, विनायक खरात, संदीप टर्ले, शहाजी राजोळे, खंडू बोडके, दिलीप कदम, बाळा सरोदे, संदीप गडाख, किसन खालकर, चंद्रभान रौदळ, राहुल गायकवाड, पंचप्रमुख आनंद खरे, मुख्याध्यापिका वंदना पवार आदी उपस्थित होते.

स्पर्धासाठी के.के. वाघ शिक्षण संस्था अध्यक्ष समीर वाघ, सचिव के.एस.बंदी, वरिष्ठ महाविद्यालय सल्लागार डॉ.आर.के. दातीर, वरिष्ठ महाविद्यालय समन्वयक डॉ.व्ही.एम. सेवलीकर यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धा यशस्वीतेसाठी स्पर्धा समन्वयक एस.पी. क्षीरसागर, महाविद्यालय क्रीडा संचालक बी.बी. कोल्हे, उपप्राचार्य प्रा.पी.पी. आहेर, उपप्राचार्या डॉ.सविता सावंत, इंग्लिश स्कूल क्रीडा शिक्षक गणेश भगरे आदींसह शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी परिश्रम घेतले. सदर स्पर्धांमध्ये निफाड, दिंडोरी, चांदवड, सिन्नर, येवला येथील मुले-मुली असे एकूण ६३ संघ सहभागी झाले होते. अटीतटीच्या स्पर्धांमध्ये खो-खो स्पर्धेत मुलांच्या संघात प्रथम : अश्व फाऊंडेशन दिंडोरी, द्वितीय : बलराम निफाड, तृतीय : जगदंब ११ कोठूरे विजयी झाले. तर मुलींच्या संघात पुंजाजी भोर, ठाणगाव यांनी प्रथम, रयत शाळा ठाणगाव द्वितीय तर एस.एम.जे.बी चांदवड या संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.



व्हॉलीबॉल स्पर्धेत मुलींच्या गेम चेंजर, के.के. वाघ चांदोरी व जी.एम.डी. सिन्नर या संघानी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. मुलांच्या संघानी एचएएल ओझर प्रथम, चांदवड टोलनाका द्वितीय व जत्रा बॉईज तृतीय क्रमांकाने विजय मिळविला.